





# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६६। किंमत - ५ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार १०/०७/२०२६ । पाने - ६







# पालिका निवडणूकीतील पराभवातून बेछूट आरोप

## संगमनेरला बदनाम करण्याचा हा कुटील डाव - माजी नगराध्यक्षा दुगार्गाताई तांबे

**प्रशासकीय बाबींना प्रशासक जबाबदार असतो**

**नगरपरिषदेचे कामकाज करताना प्रशासकीय बाबींची जबाबदारी ही प्रशासनाची म्हणजे मुख्याधिकाऱ्यांची असते. यामध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, किंवा नगरसेवकांचा यांचा कोणताही संबंध नसतो. यामुळे प्रशासकीय बाबींबाबत प्रशासकीय अधिकारी उत्तर देतील. यामध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचे नाव घेऊन संगमनेरला बदनाम करणाऱ्या या प्रवृत्तीचा आम्ही तीव्र निषेध करतो.**

**विश्वासराव मुर्तडक, माजी नगराध्यक्ष**



**संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नवीन लोकप्रतिनिधी यांची नगराध्यक्ष पदाची घरातील उमेदवार यांनी सपाटून मार खाल्ला. याचबरोबर त्यांचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने पराभूत झाले. मूलभूत प्रश्न सोडून वेगळ्याच विषयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांचा हा उद्योग असून संगमनेर तालुक्यातील व शहरांमधील जनतेमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे व्यक्तिगत आकासापोटी ते खोटे व तथ्यहीन आरोप इतक्या मोठ्या सभागृहात करत आहेत. कदाचित शहरांमधून एक वर्षापासून टक्केवारी बंद झाल्याने वैफल्यग्रस्त होऊन ते आरोप असावेत.**

**सोमेश्वर दिवटे, संगमनेर शहराध्यक्ष**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -निळवंडे धरणातून संगमनेर शहरासाठी ऐतिहासिक थेट पाईप लाईन योजना पूर्णपणे यशस्वी ठरली आहे. यामुळे शहरवासीयांना दररोज स्वच्छ व मुबलक पाणी मिळत आहे. या योजनेला २००९ मध्ये नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन व जीवन प्राधिकरणसह सर्व विभागांच्या मंजुरी मिळाली आहे. २००९ च्या योजनेबाबत २०२६ मध्ये अत्यंत खोटे व चुकीचे आरोप करून नवीन लोकप्रतिनिधी हे संगमनेर शहर व तालुक्याची राज्यात बदनामी करत आहे. या योजनेच्या चौकशीचे आम्ही स्वागत करत असून दूध का दूध और पानी का पानी होऊन खोटे आरोप करणारे तोंडघाशी पडतील, खरे तर नगरपालिका निवडणुकीमध्ये सपाटून मार खाल्ल्यामुळे ते वैफल्यग्रस्त होऊन आरोप करत असल्याची टीका माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांनी केली आहे.

संगमनेरचे नवीन लोकप्रतिनिधी यांनी विधानसभेसारख्या पवित्र सभागृहामध्ये संगमनेरची बदनामी केल्याप्रकरणी सौ दुर्गाताई तांबे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, संगमनेर शहर हे विकसित व शांततेचे शहर आहे. या शहरातील वाढती लोकसंख्या गृहीत धरून निळवंडे धरणातून ऐतिहासिक थेट पाईपलाईन योजना राबविण्यात आली. आणि ही योजना अत्यंत यशस्वी ठरली आहे. त्यामुळे शहरातील सर्व जनतेला मुबलक व स्वच्छ पाणी दररोज मिळत आहे.

५ मे २००९ रोजी प्रधान सचिव व सर्व विभागांची महाराष्ट्रातील यूआयडीएसएसएमटी योजने संदर्भात बैठक झाली यावेळी लोकसभा व विधानसभेच्या आचारसंहिता लक्षात घेऊन निविदा प्रक्रिया व कामे पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करणे बाबत व कार्यादेश ३१ जुलै २००९ पूर्वी करण्याचे स्पष्ट आदेश दिले. या आदेशानुसारच तत्कालीन मुख्याधिकारी यांनी या योजनेचे प्रकल्प सल्लागार यांची सर्व संबंधित विभागांच्या जीवन प्राधिकरणाच्या आवश्यक मंजुरी घेऊनच कार्यादेश देण्याबाबत प्रशासकीय बाबी पूर्ण केलेल्या आहेत. योजनेचे सर्व काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण झालेली असून त्यामुळे शहरातील सर्व प्रभागांना पूर्ण दाबाने पाणीपुरवठा होत आहे या कामाचे थर्ड पार्टी ऑडिट करूनच बिल अदा करण्यात आलेले आहे. याप्रमाणे सर्व विभागांच्या मंजुरी असल्याने कोणतेही चुकीचे काम झालेले नसून फक्त दिशाभूल करण्यासाठी नवीन लोकप्रतिनिधी हे आरोप करीत आहेत. (पान ४ वर)

# कार अपघातातून उघड झाला गुटखा तस्करीचा पर्दाफाश

## आठ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोघे जखमी



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील कऱ्हे घाटात गुरुवारी सकाळी झालेल्या भीषण कार अपघातातून अवैध गुटखा वाहतुकीचे मोठे रॅकेट उघडकीस आले. नाशिकहून संगमनेरच्या दिशेने येणारी इनोव्हा कार (क्र. एमएच-०१-बीबी-९१४९) घाटातील तीव्र वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने थेट दरीत कोसळली. या अपघातात कारमधील दोन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर संगमनेर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. कार खोल दरीत कोसळल्यामुळे क्रेनच्या साहाय्याने ती बाहेर काढण्यात आली. त्यानंतर वाहनाची तपासणी करताना पोलिसांनाही धक्का बसला. कारमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध गुटख्याचा साठा आढळून आला. पोलिसांनी वाहनातून तब्बल ८ लाख ३७ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला असून संपूर्ण मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. एका साध्या अपघाताच्या तपासातून थेट गुटखा तस्करीचा पर्दाफाश झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अपघातात जखमी झालेले दोन्ही युवक अद्याप उपचाराधीन असून ते (पान ६ वर)

# बसस्थानकासमोरील विद्यानगरमध्ये पार्किंगचा गंभीर प्रश्न; रहिवाशांचा संताप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील बसस्थानकासमोरील विद्यानगर परिसरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या वाहतूक कोंडी व पार्किंगच्या समस्येमुळे स्थानिक रहिवाशांचे जीवन अक्षरशः त्रस्त झाले आहे. हा परिसर शहरातील प्रतिष्ठित वसाहतींपैकी एक मानला जात असला, तरी मोठी रुग्णालये, विविध कार्यालये आणि स्टेट बँकेसारख्या प्रमुख संस्थांमुळे येथे वाहनांची प्रचंड गर्दी होत असून त्याचा फटका स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे.

विद्यानगर परिसरात असलेल्या स्टेट बँकेचे हजारो ग्राहक दररोज विविध कामांसाठी येतात. मात्र, बँकेकडे स्वतःची पार्किंग व्यवस्था नसल्याने ग्राहकांची दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभी केली जातात. याचप्रमाणे परिसरातील इतर आस्थापनांकडेही पार्किंगची सोय नसल्याने संपूर्ण रस्ताच वाहनतळाचे स्वरूप धारण करतो.

परिणामी, या मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून रुग्णवाहिका, शालेय वाहने तसेच सर्वसामान्य (पान ५ वर)

# प्रशासनाची झोप कायम!

## संगमनेर बसस्थानकातील स्वच्छतागृह अजूनही बेवारस

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर बसस्थानकातील स्वच्छतागृहाच्या दुरवस्थेबाबत माध्यमांतून वृत्त प्रसिद्ध होऊनही संबंधित प्रशासन आणि ठेकेदाराला अद्याप जाग आलेली नाही. परिणामी, बसस्थानकातील स्वच्छतागृह आजही बेवारस अवस्थेत असून असह्य दुर्गंधी, साचलेली घाण आणि तुंबलेल्या शौचालयांमुळे प्रवाशांवर अक्षरशः नाक दाबून नैसर्गिक विधी उरकण्याची वेळ आली आहे.

राज्यातील प्रमुख बसस्थानकांपैकी एक असलेल्या संगमनेर बसस्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. महिलांपासून ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांनाही या अस्वच्छतेचा मोठा फटका बसत आहे. स्वच्छतागृहात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून दुर्गंधीमुळे काही क्षणही उभे राहणे कठीण झाले आहे.

विशेष म्हणजे, काही असामाजिक प्रवृत्तीच्या व्यक्तींनी स्वच्छतागृहात दारूच्या रिकाम्या बाटल्या, पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्या तसेच तंबाखू-गुटख्याच्या पुड्या टाकल्याने अनेक शौचालये तुंबली आहेत. त्यामुळे अस्वच्छतेत आणखी भर पडली असून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने स्वच्छतागृह प्रवाशांसाठी विनामूल्य खुले करत त्याच्या देखभालीची जबाबदारी स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीकडे सोपविली होती. मात्र, कंपनीने अद्याप प्रभावीपणे काम सुरू न केल्यामुळे संपूर्ण व्यवस्था कोलमडली आहे. (पान ४ वर)

## दुरावस्था संपणार कधी ?


















# चिमुरडीच्या अपघातानंतर ग्रामस्थांचा संताप

## स्पीड ब्रेकर, पथदिवे व सीसीटीव्हीच्या मागणीसाठी रास्ता रोको



युवावार्ता (प्रतिनिधी)

सुकेवाडी - गावातील एका चिमुरडीला झालेल्या भीषण अपघातानंतर सुकेवाडी परिसरातील ग्रामस्थांचा संताप अनावर झाला. अपघातप्रवण ठिकाणी तातडीने स्पीड ब्रेकर, पथदिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी घुलेवाडी-समनापूर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

ग्रामस्थांनी सांगितले की, अपघात घडवून संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला असून त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. या अपघातात चिमुरडी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून भविष्यात अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली.

आंदोलकांनी आरोप केला की, संबंधित ठिकाणी स्पीड ब्रेकर, पथदिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत ग्रामस्थांनी १६ ऑक्टोबर २०२५ रोजी ग्रामपंचायतीकडे लेखी निवेदन दिले होते. त्यानंतर ग्रामपंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहारही केला. मात्र जवळपास वर्षभर उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर हा अपघात घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

प्रशासनाने आणि संबंधित विभागांनी वेळेत आवश्यक उपाययोजना केल्या असत्या, तर हा अपघात टाळता आला असता, अशी तीव्र भावना नागरिकांनी व्यक्त केली. तसेच या प्रश्नावर ग्रामपंचायत आणि प्रशासनाने अधिक ठाम व आक्रमक भूमिका घेणे अपेक्षित होते, असेही आंदोलकांनी सांगितले. रास्ता रोको आंदोलनानंतर प्रशासनाने संबंधित ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारण्याबाबत हालचाली सुरू केल्याची माहिती मिळाली. मात्र आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित असतानाही संबंधित वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी न आल्याने आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.जोपर्यंत संबंधित अधिकारी घटनास्थळी येऊन ठोस आश्वासन देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता.

दरम्यान, संबंधित ठिकाणी तातडीने स्पीड ब्रेकर उभारणे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, पुरेशा प्रमाणात पथदिव्यांची व्यवस्था करणे तसेच अपघातप्रवण ठिकाणांची सुरक्षा वाढविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाचे दुःख नसून संपूर्ण गावाच्या सुरक्षिततेशी निगडित प्रश्न असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने प्रभावी पावले उचलावीत, अशी एकमुखी मागणी नागरिकांनी केली.

# संगमनेर- अकोलेला लवकरच स्वतंत्र परिवहन कार्यालय ?

## आ. तांबे यांच्या पाठपुराव्याला यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथे स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन व्हावे, या अनेक वर्षांपासूनच्या मागणीला नव्या शासन निकषांमुळे नवी दिशा मिळाली आहे. यासंदर्भात आमदार सत्यजीत तांबे यांनी परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांची भेट घेऊन संगमनेर, अकोले आणि परिसरातील नागरिकांच्या सोयीचा विचार करून नव्या निकषांनुसार स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास मंजुरी द्यावी, अशी मागणी केली.

यावेळी परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देत नव्या शासन अध्यादेशातील निकषांनुसार संगमनेरसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा प्रस्ताव सकारात्मकरीत्या तयार करून शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

संगमनेर हे अहिल्यानगर जिल्ह्यातील महत्त्वाचे व्यापारी, शैक्षणिक आणि वाहतूक केंद्र असून येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाहनांची खरेदी-विक्री होते. मात्र, वाहन नोंदणी, वाहन चालविण्याचा परवाना, कर भरणा आणि इतर परिवहन सेवांसाठी संगमनेर, अकोले तसेच परिसरातील नागरिकांना दूरवरच्या कार्यालयांमध्ये जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे.

याच पार्श्वभूमीवर आमदार सत्यजीत तांबे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न शासनाच्या विविध स्तरांवर सातत्याने मांडला असून, त्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

**मागणीचा सातत्यपूर्ण पाठपुरावा -**

२४ मार्च २०२५ : तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे संगमनेरसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी काही तांत्रिक कारणांमुळे स्वतंत्र कार्यालयाऐवजी स्वतंत्र शिबिर कार्यालयास मंजुरी देण्यात आली. मात्र, हे शिबिर कार्यालय अद्याप कार्यान्वित झाले नसल्याने ते तातडीने सुरू करावे आणि पुढे संगमनेर-अकोलेसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास मंजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. जुलै २०२५ (पावसाळी अधिवेशन) विधान परिषदेत संगमनेर, अकोले आणि परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याचा प्रश्न पुन्हा प्रभावीपणे उपस्थित करण्यात आला आणि शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

संगमनेर आणि परिसरातील लाखो नागरिकांना अधिक कार्यक्षम, सुलभ आणि जवळच्या ठिकाणी परिवहन सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अंतिम निर्णय होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे आ. तांबे यांनी सांगितले.

# तृणमूल काँग्रेसला धक्का

## ईडीने ४४० कोटींच्या ठेवी गोठवल्या



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) धनशोधन प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) अंतर्गत कारवाई करत तृणमूल काँग्रेसच्या ४४०.४२ कोटी रुपयांच्या बँक ठेवी गोठवल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही रक्कम पक्षाच्या तीन खासगी बँक खात्यांमध्ये जमा होती. या प्रकरणावर तृणमूल काँग्रेसकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नव्हती.

ईडीने मंगळवारी कोलकाता येथे पाच ठिकाणी छापेमारी केली. यामध्ये केअरवेल ग्रुप ऑफ कंपनीज तसेच त्यांची विमान चार्टर सेवा चालवणारी कंपनी केअरवेल एव्हिएशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडशी संबंधित ठिकाणांचाही समावेश होता. ईडीचा आरोप आहे की, प्राथमिक तपासात एप्रिल २०२३ ते जून २०२६ या कालावधीत तृणमूल काँग्रेसच्या खात्यांमधून सुमारे १६० कोटी रुपये केअरवेल एव्हिएशन आणि तिच्या संबंधित कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आले.तपासादरम्यान असेही समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे की, संबंधित कंपनीने २०२३ ते २०२६ या कालावधीत ८२.९६ कोटी रुपये एका नव्याने स्थापन झालेल्या कंपनीकडे वर्ग केले. ईडीच्या माहितीनुसार, याच निधीपैकी ११२ कोटी रुपयांचा वापर एम्ब्रेयर लेगेसी ६०० या बिझनेस जेटची तसेच ऑगस्टावेस्टलँड १०९ एसपी हेलिकॉप्टरची खरेदी करण्यासाठी करण्यात आला. एजन्सीचे म्हणणे आहे की, त्यानंतर ही दोन्ही हवाई वाहतूक साधने भाडेतत्त्वावर तृणमूल काँग्रेसला उपलब्ध करून देण्यात आली.

यापूर्वी, गेल्या महिन्यात कोलकाता पोलिसांनी पक्षातील बंडखोर आमदारांच्या तक्रारीच्या आधारे या तीन बँक खात्यांमधून रक्कम काढण्यावर निर्बंध घातले होते. या तक्रारीत पक्ष निधीच्या स्रोतांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती.

# संगमनेर येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल

संगमनेर (प्रतिनिधी) - संगमनेर येथील शिक्षण प्रसारक संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय द्वितीय वर्षाचा निकास १०० टक्के लागला असून या नेत्रदिपक यशाचे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी व सचिव डॉ. राजेंद्र लड्ढा व पदाधिकारी यांनी कौतुक केले आहे.

महाविद्यालयात संध्या कोटकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर द्वितीय क्रमांक घुगे अर्चना यांनी पटकावला आहे. तृतीय क्रमांक अनुक्रमे जयसिंग लामटुळे , दिलीप बांबळे यांनी पटकावला आहे तर चतुर्थ क्रमांक प्रिया सालपुरे यांनी पटकावला आहे. अनुक्रमे पाचवा भाग्यश्री घोडे, सुप्रिया राऊत, सविता जाधव यांनी तर सुजाता म्हस्के, निशा भागवत, साधना कुळधरण, वैशाली शिंदे, सविता चौधरी, जयश्री काटे, वैष्णवी खोलम, नवले धनश्री यांनी सुद्धा विशेष यश संपादन केले आहे. या वर्षी सुद्धा महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. एकूण निकालामध्ये ओ ग्रेट मध्ये ३९ विद्यार्थी आहे तर ए प्लस ग्रेड मध्ये ३९ व ए ग्रेड मध्ये २० विद्यार्थी इतकी संख्येने यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयाचा एकूण १०० टक्के निकाल लागल्याने महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनाची परंपरा कायम राखण्यात यश आले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे, महाविद्यालयीन परीक्षा विभाग प्रमुख प्रा. नयना पंजे व सर्व प्राध्यापक यांनी यशस्वी विद्यार्थांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मराठवाड्यात एकाचवेळी ३ जिल्ह्यांना भुकंपाचे सौम्य धक्के

नांदेड (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात एकीकडे पावसाने धुमाकूळ घातलेला असताना दुसरीकडे मराठवाडा भूकंपाच्या धक्क्याने हादरला आहे. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यांमध्ये हे धक्के जाणवले. रात्री १.३७ वाजल्यापासून ३.२३ वाजेपर्यंत भूकंपाचे हे धक्के नागरिकांना जाणवले. या भूकंपाची तीव्रता ३.६ ते ४.६ रिश्टर स्केल नोंदवण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

हिंगोली, नांदेड आणि परभणी या ३ जिल्ह्यात भूकंपाचे चार सौम्य धक्के बसले. जिल्ह्याच्या आपत्कालीन केंद्रावर १.३७ वाजता, २.१५ वाजता, २.१७ आणि ३.२३ वाजता या भूकंपाच्या धक्क्यांबाबत माहिती मिळाली. या धक्क्यांची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे ४.६, ३.६, ३.९ आणि ४.१ इतकी मोजण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात असलेल्या शिरली गावात होता. सुदैवाने यामुळे कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेची हानी झाली नाही. जेव्हा हे धक्के जाणवले, तेव्हा बहुतेक लोक घरी झोपलेले होते. अनेकजण घराबाहेर पडले. हिंगोली, नांदेड आणि परभणी परिसरातील अनेक लोकांना हे धक्के जाणवले. पहिल्या धक्क्याचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात पांगरा शिंदे गावाच्या दक्षिणेला असलेल्या शिरली गावाजवळ होता. त्याची खोली १० किलोमीटर मोजण्यात आली. त्यानंतरच्या दोन धक्क्यांचे केंद्रबिंदू पांगरा शिंदे गावाच्या वायव्येला असलेल्या काकरढाबा गावाजवळ होते, त्याचीही खोली १० किलोमीटर होती.

गेल्या सहा वर्षांत हिंगोली जिल्ह्यातील औंधा नागनाथ, कळमनुरी आणि वसमत तालुक्यांमध्ये ३७ हून अधिक सौम्य भूकंपांचे धक्के नोंदवले गेले आहेत. मात्र एकाच रात्रीत चार भूकंपांचे धक्के बसण्याची ही पहिलीच घटना आहे. धाराशिवमध्ये गूढ आवाजगेल्या आठवड्यात धाराशिवला गूढ आवाज येण्याची मालिकाच सुरू होती. धाराशिव जिल्ह्यात दरवर्षी पावसाळ्यात सातत्याने गूढ आवाज होतात. हा आवाज व त्यामुळे बसणाऱ्या हादऱ्याची तीव्रता जवळपास पूर्ण जिल्ह्यात जाणवते.

# पुण्यात इमारत पत्त्यांसारखी कोसळली

## ढिगाऱ्याखाली १४ जण अडकले



पुणे (वृत्तसंस्था)

पिंपरी-चिंचवड परिसरातील मोशी येथून एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी बातमी समोर येत आहे. मोशी कचरा डेपोच्या जवळ असलेली एक दोन मजली इमारत अचानक पत्त्यांसारखी कोसळली आहे. या भीषण दुर्घटनेत इमारतीखाली सुमारे १० ते १४ जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून अग्निशमन दलाच्या गाड्या आणि रेस्क्यू टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही इमारत दोन मजली होती. इमारत कोसळली तेव्हा आतमध्ये अनेक लोक उपस्थित होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या अंदाजानुसार, कमीत कमी १० ते १५ नागरिक या ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. ढिगारा उपसण्याचे काम वेगाने सुरू असून, अडकलेल्या लोकांना तात्काळ वैद्यकीय मदत देण्यासाठी रुग्णवाहिकाही घटनास्थळी पाचारण करण्यात आल्या आहेत.

# डिजिटल पाळतीच्या विळख्यात अडकत चाललेले खासगी आयुष्य




आजचे जग वेगाने डिजिटल होत आहे. स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही, ओटीटी प्लॅटफॉर्म, स्मार्ट स्पीकर्स, कनेक्टेड कार आणि सोशल मीडियामुळे आपले जीवन पूर्वीपेक्षा अधिक सोयीचे, जलद आणि आधुनिक बनले आहे. एका क्लिकवर जगभरातील माहिती मिळते, मनोरंजन उपलब्ध होते आणि हजारो किलोमीटर दूर असलेल्या व्यक्तीशी क्षणार्धात संवाद साधता येतो. मात्र, या सुविधांच्या बदल्यात आपण नकळत आपल्या खासगी आयुष्याचे दरवाजे उघडे करत आहोत. आज कनेक्टिव्हिटी ही केवळ सोय राहिलेली नसून ती गोपनीयतेसाठी एक गंभीर धोका बनली आहे.

आपल्या हातातील स्मार्टफोन हे याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. अनेक मोबाईल ॲप्स वापरकर्त्यांच्या संमतीने किंवा अनेकदा त्यांच्या नकळत लोकेशन, संपर्क यादी, कॅमेरा, मायक्रोफोन आणि इतर संवेदनशील माहितीचा वापर करतात. अनेकांना असा अनुभव येतो की, एखाद्या विषयावर मित्रांशी चर्चा केल्यानंतर त्याच विषयाशी संबंधित जाहिराती सोशल मीडियावर किंवा इतर ॲप्सवर दिसू लागतात. त्यामुळे आपले संभाषण ऐकले जाते का, असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो. जीपीएस आणि विविध सेन्सर्सच्या मदतीने आपल्या हालचाली, सवयी आणि आवडी-निवडींचा मागोवा घेतला जातो.

स्मार्ट टीव्ही आणि ओटीटी प्लॅटफॉर्मनेही या पाळतीच्या जाळ्याला अधिक व्यापक केले आहे. आपण कोणते चित्रपट पाहतो, कोणते कार्यक्रम आवडीने पाहतो, किती वेळ स्क्रीनसमोर घालवतो याची माहिती सातत्याने संकलित केली जाते. अनेक स्मार्ट टीव्हीमध्ये असलेले मायक्रोफोन आणि कॅमेरे वापरकर्त्यांच्या गोपनीयतेबाबत प्रश्न निर्माण करतात. ओटीटी प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांच्या आवडी-निवडींचे विश्लेषण करून त्यानुसार सामग्री आणि जाहिराती दाखवतात. ही माहिती केवळ व्यावसायिक वापरापुरती मर्यादित राहते की इतर संस्थांपर्यंत पोहोचते, हा चिंतेचा विषय आहे.

घरातील स्मार्ट स्पीकर्स आणि व्हॉइस असिस्टंट्सही सतत सज्ज अवस्थेत असतात. वेक वर्ड ऐकताच ते सक्रिय होतात, मात्र त्यासाठी त्यांना आजूबाजूच्या संभाषणांवर सतत लक्ष ठेवावे लागते. त्यामुळे ही उपकरणे नेमकी किती माहिती संकलित करतात आणि ती कुठे वापरली जाते, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात.वाय-फाय तंत्रज्ञानही आता केवळ इंटरनेटपुरते मर्यादित राहिलेले नाही. विविध संशोधनांमधून असे समोर आले आहे की, आधुनिक वाय-फाय तंत्रज्ञानाच्या मदतीने घरातील व्यक्तींच्या हालचाली आणि उपस्थितीचा अंदाज मोठ्या अचूकतेने लावता येतो. यामुळे भविष्यात गोपनीयतेच्या संकल्पनेलाच नवे आव्हान निर्माण होण्याची शक्यता आहे.

कनेक्टेड कार हे आधुनिक तंत्रज्ञानाचे आणखी एक उदाहरण आहे. वाहनांमध्ये बसवण्यात आलेले सेन्सर्स चालकाची ड्रायव्हिंग शैली, प्रवासाचे मार्ग, वेग, सीटचा वापर आणि इतर अनेक गोष्टींची नोंद ठेवतात. काही अहवालांनुसार, या माहितीचा वापर व्यावसायिक कारणांसाठी किंवा तृतीय पक्षांना उपलब्ध करून देण्यासाठीही केला जाऊ शकतो. त्यामुळे वाहन चालवतानाही आपली गोपनीयता सुरक्षित राहते का, हा प्रश्न उपस्थित होतो.

या सर्व प्रक्रियेमध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वापरकर्त्यांची अनभिज्ञता. बहुतांश लोक कोणत्याही ॲप किंवा सेवेसाठी -ललशर्ी किंवा -श्रश्रे या पर्यायांवर क्लिक करतात; मात्र गोपनीयता धोरणे वाचण्याची तसदी घेत नाहीत. परिणामी, आपली माहिती कशासाठी वापरली जाणार आहे, ती किती काळ जतन केली जाणार आहे किंवा ती इतर कोणाशी शेअर केली जाणार आहे, याची कल्पनाही अनेकांना नसते.

डिजिटल युगात गोपनीयता ही चैनीची गोष्ट नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना जागरूक राहणे, ॲप्सना आवश्यक तेवढ्याच परवानग्या देणे, गोपनीयता सेटिंग्ज तपासणे आणि विश्वसनीय सेवांचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर सरकार आणि तंत्रज्ञान कंपन्यांनीही वापरकर्त्यांच्या डेटाच्या सुरक्षेसाठी कठोर नियम आणि पारदर्शक धोरणे स्वीकारली पाहिजेत.

# पुराच्या पाण्यात ३ हजार एलपीजी सिलिंडर गेले वाहून



रायगड (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील रायगडमध्ये पावसानंतर ३ हजार एलपीजी सिलिंडर पाताळगंगा नदीत वाहून गेले. पनवेलमधील एलपीजी बॉटलिंग प्लांटमध्ये पूर आल्यानंतर सिलेंडर वाहून गेले. प्रशासनाने लोकांना आवाहन केले आहे की, जर कुठे सिलेंडर सापडले तर त्याला स्पर्श करू नका आणि घरी घेऊन जाऊ नका.

मध्य प्रदेशात बुधवारी २७ हून अधिक जिल्ह्यांमध्ये पाऊस झाला. सर्वाधिक १.७५ इंच पाऊस दमोहमध्ये नोंदवला गेला. खरगोनमध्ये रूपारेल नदीच्या जोरदार प्रवाहात एक तरुण वाहून गेला.

राजस्थानमधील अजमेर जिल्ह्यातील किशनगडमध्ये बुधवारी रात्री पावसामुळे एक घर कोसळले. या अपघातात पती-पत्नीसह तीन लोक ढिगाऱ्याखाली दबले. तिघांनाही वाचवून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अलवरमध्ये पावसामुळे बाजारातील रस्ते पाण्याखाली गेले.

इकडे, दिल्लीत आज सकाळपासून पाऊस पडत आहे. रेल्वे स्टेशन, मुनिरका आणि अनेक भागांतील रस्ते पाण्याखाली गेले. हवामान विभागाने आज ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. बुधवारी रोहिणीमध्ये एक बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळून तीन लोकांचा मृत्यू झाला.गुजरातच्या सुरतमध्ये सलग तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पुरात तीन दिवसांत १९ लोकांचा मृत्यू झाला आहे. तर, महाराष्ट्रातील पुण्यात मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा डोंगर तीन मजली इमारतीवर कोसळला, त्यामुळे इमारत कोसळली.


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!


दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ वेळेत देण्यासाठी प्रशासनाकडून समन्वय



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार ५९४ पात्र खात्यांपैकी १ लाख ९२ हजार २८२ खात्यांची माहिती प्रणालीवर अपलोड करण्यात आली असून, हे प्रमाण ९९.८४ टक्के इतके आहे. पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ वेळेत, पारदर्शक व सुलभ पद्धतीने मिळावा यासाठी कृषी विभाग, सहकार विभाग आणि बँक यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधला जात आहे.

योजनेची अंमलबजावणी सुरळीत व्हावी यासाठी संबंधित सर्व यंत्रणा कार्यरत असून, शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करून प्रशासनाशी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेबाबत मार्गदर्शन करणे, आवश्यक कागदपत्रांची माहिती उपलब्ध करून देणे आणि शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्याची जबाबदारी कृषी विभागावर सोपविण्यात आली आहे. तसेच विविध माध्यमांतून योजनेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. सहकार विभागामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विविध सहकारी संस्था आणि संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून प्रशासकीय प्रक्रिया सुरळीत करण्यात येत आहे.

दरम्यान, बँकांकडून कर्ज खात्यांची पडताळणी, नोंदींची शहानिशा तसेच आवश्यक आर्थिक माहिती अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले बँक खाते कार्यरत ठेवावे, केवायसी (घधउ) प्रक्रिया पूर्ण करावी तसेच आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावा, असे प्रशासनाने कळविले आहे.

योजनेबाबत कोणतीही अडचण किंवा शंका असल्यास संबंधित कृषी कार्यालय, सहकार विभाग अथवा कर्ज खाते असलेल्या बँकेच्या शाखेशी संपर्क साधावा. तसेच अफवांवर विश्वास न ठेवता शासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# 'अपवित्र' विधानावरून शिवसेनेची तांबेंवर टिका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आमदार अमोल खताळ पाटील यांनी संगमनेर नगरपरिषदेतील कथित भ्रष्टाचार आणि अनियमिततेचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. त्यानंतर माजी नगराध्यक्ष अंजली सुधीर तांबे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना महाराष्ट्र विधानसभेचा अपवित्र असा उल्लेख केल्याचे समोर आले. या वक्तव्याचा शिवसेना, संगमनेर वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.

अंजली तांबे या विधान परिषद सदस्य सत्यजित तांबे यांच्या आई, माजी आमदार सुधीर तांबे यांच्या पत्नी तसेच माजी आमदार बाळासाहेब थोरात यांच्या भगिनी आहेत. त्यांच्या कुटुंबाने अनेक दशके विधानमंडळात प्रतिनिधित्व केले असून, स्वतः त्यांनीही १५ वर्षे नगराध्यक्ष म्हणून काम केले आहे.त्यामुळे विधानसभेसारख्या सर्वोच्च लोकशाही संस्थेबाबत अशा प्रकारची भाषा वापरणे अधिकच खेदजनक आहे. लोकशाही व्यवस्थेत सरकारवर टीका करण्याचा आणि मतभेद व्यक्त करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र, महाराष्ट्र विधानसभेलाच अपवित्र म्हणणे म्हणजे केवळ सभागृहाचा नव्हे, तर जनतेच्या लोकशाही प्रक्रियेचा आणि जनादेशाचाही अवमान आहे.

आमदार अमोल खताळ पाटील यांनी उपस्थित केलेल्या कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर वस्तुनिष्ठ उत्तर देण्याऐवजी विधानसभेबाबत अशा प्रकारचे वक्तव्य करणे योग्य नाही. सार्वजनिक जीवनातील जबाबदार व्यक्तींनी लोकशाही संस्थांचा सन्मान राखणे अपेक्षित आहे. शिवसेना, संगमनेर यांच्या वतीने या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात येत असून, महाराष्ट्र विधानसभेबाबत केलेल्या वक्तव्याबाबत संबंधितांनी स्पष्टीकरण द्यावे आणि लोकशाही संस्थांचा सन्मान राखावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# महायुती सरकार भ्रष्टाचारात बुडाले श्वेतपत्रिका जाहीर करा - हर्षवर्धन सपकाळ

मुंबई (वृत्तसंस्था)

भाजपा महायुती सरकार भ्रष्टाचारात आकंठ बुडाले असून कंत्राटदार, ठेकेदार यांच्या माध्यमातून केवळ कमीशन खाण्याचे उद्योग सुरु आहेत. समृद्धी महामार्गात २० हजार कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे व तोच पैसा राजकीय पक्ष फोडण्यासाठी वापरला. या भ्रष्ट सरकारने त्यांच्या काळातील सर्व मोठ्या प्रकल्पांची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.



ज्येष्ठ काँग्रेस नेते मधुकरराव चौधरी यांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी ते जळगाव येथे प्रसार माध्यमांशी बोलत होते, सपकाळ पुढे म्हणाले की, मुंबई व परिसरात सहा दिवसात मुसळधार पाऊस पडून मोठे नुकसान झाले आहे. स्कूल बसवर झाड पडून एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाला. एक व्यक्तीचा उघड्या मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला असून इतर घटनांमध्ये १२ पेक्षा जास्त व्यक्तींचा जीव गेला आहे, जनजीवनही विस्कळीत झाले हे सर्व भाजपा महायुती सरकारच्या भ्रष्ट कारभाराचे बळी आहेत म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, याचा पुनरुच्चार सपकाळ यांनी केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या एका विधानावर विचारलेल्या प्रश्नावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, नाशिकमध्ये ढगफुटी होणार, असे जाहीर करून शाळा, महाविद्यालयांना देवेंद्र फडणवीस यांच्याच सरकारने सुट्टी जाहीर केली होती, पण ती केवळ अफवा होती, नाशिक व पंचक्रोशीत ढगफुटी तर झालीच नाही, फक्त काँग्रेसचे आंदोलन होऊ नये यासाठी त्यांनी अफवा पसरवली होती. आता ते माझे नाव न घेता मीच खोटा आहे असे म्हणत असतील तर त्यांचे विधान म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा, असेच म्हणावे लागले. देवेंद्र फडणवीस हे धादांत खोटे बोलतात. विदर्भ वेगळा झाल्याशिवाय लग्न करणार नाही, अजित पवार यांच्या पक्षाशी युती करणार नाही. सत्तेत आल्यानंतर पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षण देऊ, मराठा समाजाला फडणवीसच आरक्षण देऊ शकतो, अशा वल्गणा त्यांनी केल्या पण त्यातील काहीच केले नाही. लाडक्या बहिर्णीनाही २५०० रुपये देण्याची थाप त्यांनी मारली, त्यामुळे खोटे कोण बोलत आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

शरद पवार यांच्या पक्षाच्या विलिनिकरणावर बोलताना सपकाळ म्हणाले की, अशा उलट सुलट चर्चा सुरु आहेत पण माझ्याकडे त्याबद्दल काही माहिती नाही. त्यांचा पक्ष इंडिया आघाडीचा घटक पक्ष आहे. भाजपा विरोधात लढणाऱ्यांनी एकत्र आले पाहिजे ही काँग्रेसची भूमिका आहे.

# राज्यभर अतिवृष्टीचा इशारा

मुंबई - गेल्या काही दिवसांमध्ये पावसाने थैमान घातले. पूर्ण जून महिन्यात जेवढा पाऊस पडतो, तेवढा ६ दिवसांमध्येच कोसळला. अनेक भागात पाणी साचले. दरड कोसळल्या. काही भागात ५ दिवस पूर्ण होऊनही पाणी अजूनही साचलेले आहे. मुंबईत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. ज्याचा लोकल सेवेवर थेट परिणाम झाला. राज्यात पावसाने १ जुलैपासून धुमाकूळ घातला. आज कुठे पाऊस उघडला आहे. सूर्याचे दर्शनही होत नव्हते. यंदा २ जून रोजी केरळमध्ये मॉन्सून दाखल झाला. त्यानंतर तब्बल काही दिवस हा मॉन्सून अरबी समुद्रातच रेंगाळत होता. जून महिना संपत आला तरीही मॉन्सूनचा पाऊस राज्यात दाखल झाला नव्हता. शेवटी जोरदार पावसाला सुरूवात झाली. १ जुलैपासून राज्यात धुव्वाधार पाऊस झाला. आजही अनेक भागात भारतीय हवामान विभागाने पावसाचा मोठा इशारा दिला. अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला. काल पुण्यातील काही भागात पाऊस झाला. मुंबईतही रात्री पाऊस सुरू होता. अखेर सकाळी मुंबईत पावसाने विश्रांती घेतली. कोकणात पावसाचा जोर कमी झाला. सातारा आणि पुणे घाटमाथा परिसरात अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. कोकणात पावसाचा आज येलो अलर्ट जारी करण्यात आला.मॉन्सून संपूर्ण देशात दाखल झाला असून पोषक वातावरण मिळत आहे. गुजरात आणि केरळच्या किनाऱ्या लगत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, जळगाव, धुळे, नाशिक घाटमाथा या भागात आज पाऊस हजेरी लावेल. विदर्भ आणि मराठवाड्यात काही भागात विजांसह पाऊस होण्याचा अंदाज आहे.वापरण्याची वेळ आली.

# गुडघेदुखी आणि फ्रॅक्चरकडे दुर्लक्ष करु नका : डॉ. निखिल रहांगडाले

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे फ्रॅक्चर उपचार, सांध्यांच्या दुखापती, स्नायूबंधांच्या इजा, गुडघा व खांद्यावरील शस्त्रक्रिया तसेच विविध अस्थिरोगांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपचार केले जातात. याशिवाय गुडघा सांधा प्रत्यारोपण आणि नितंब सांधा प्रत्यारोपण यांसारख्या अत्याधुनिक शस्त्रक्रियाही येथे यशस्वीपणे केल्या जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

आधुनिक जीवनशैली, वाढते वय, अपघात तसेच शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे हाडे आणि सांध्यांच्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मात्र, वेळीच निदान आणि योग्य उपचार घेतल्यास बहुतांश रुग्ण पूर्ववत आयुष्य जगू शकतात, असे मत मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथील अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. निखिल रहांगडाले यांनी व्यक्त केले.

डॉ. रहांगडाले म्हणाले की, सततची गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, खांदेदुखी, सांध्यांमध्ये सूज, फ्रॅक्चर किंवा क्रीडा दुखापतींकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. अनेक रुग्ण वेदना सहन करत राहतात किंवा स्वतःहून औषधोपचार करतात. त्यामुळे आजार अधिक गंभीर होण्याची शक्यता वाढते.

अनुभवी अस्थिरोग तज्ज्ञांची टीम, आधुनिक शस्त्रक्रिया कक्ष आणि प्रगत वैद्यकीय सुविधा यामुळे रुग्णांना दर्जेदार आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. हाडे मजबूत ठेवण्यासाठी नियमित



व्यायाम, संतुलित आहार, कॅल्शियम आणि जीवनसत्त्व 'डी'चे योग्य प्रमाण, योग्य वजन राखणे तसेच तंबाखू आणि धूम्रपान टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कोणतीही वेदना किंवा दुखापत झाल्यास विलंब न करता अस्थिरोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे विविध अस्थिरोगांवर अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध असून महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना तसेच इतर शासकीय योजनांअंतर्गत पात्र रुग्णांवर उपचार केले जातात.

# विठ्ठल नाम हेच वारकऱ्यांचे बळ

विठ्ठलाचे नाम हा वारकऱ्यांचा मुख्य पाया आहे. विठ्ठलाचा नाम गजर करणे, त्यासाठी प्रेमभक्तीचा मार्ग म्हणजेच संतांच्या पालखीचा मार्ग आहे.यज्ञयाग नको, जप जाप्य नको . फक्त विठ्ठलाचे नामस्मरण त्याच्या नावाचं उच्चार करणे, हे जरी केले तरी पुष्कळ आहे. विठ्ठलाचे नाम घेणे सोपे दिसले तरी ते नाम आपल्या मुखात येण्यास अनेक जन्माची पुण्याई असेल तरच ते येते. जन्म जन्मातरी । असेल पुण्यसामग्री। तरीच नाम जिव्हाग्री । येईल श्रीरामाचे।। बहुत सुकृतांची जोडी। म्हणून विठ्ठली आवडी।। तसेच अनंत जन्माचे तप एक नाम. ज्याने विठ्ठलाचे नाम घेतले त्याचे पुण्य ही अपार आणि अनंत आहे. हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी. विठ्ठलाचे नाम घेणाऱ्याच्या पुण्याचे मोजमाप करता येत नाही. म्हणून तर पायी पालखी सोहळ्यामध्ये अखंड विठ्ठल नामाचा जप चाललेला असतो. विठ्ठलाचे नाम घेण्यासाठी आपल्याला संसार सोडावा लागत नाही त्यासाठी शुद्ध भाव आणि श्रद्धा हवी. माऊली म्हणतात, मी तर केवळ हरिनामाचे पाठ केल्याने मला सर्वत्र व्यापक रूपाने हरी दिसतो .नित्य अखंड ज्याच्या मुखातून हरीचे नाम घेतले ,त्याच्यावर कळी काळाची दृष्टी पडू शकत नाही. पापाचे कळप सुद्धा पळून जातात .विठ्ठलाचे नाम हे सूर्यासारखे आहे. पाप हे अंधार आहे. सूर्यापुढे अंधार टिकत नाही. हरी हा सर्व व्यापक आहे. राम कृष्ण हरी नामाने शरीर पवित्र आणि ब्रह्मरूप होते. रोज आपण फक्त नऊ मिनिटे विठ्ठल विठ्ठल हा जप केल्याने, टाळ्या वाजवल्याने आपला पल्स रेट आणि रक्तदाब सुद्धा नियंत्रित राहतो. हा माझा स्वतःचा अनुभव आहे. रोज नित्यनेमाने नामजपाने सकारात्मक ऊर्जा आणि मन शांती मिळते. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांचे हेच वैशिष्ट्य आहे .आपल्याला त्यांचे चेहरे सतत आनंदी दिसतात. याचे कारणच त्यांच्या मुखातून सतत नाम जप चाललेला



असतो. त्यामुळे त्यांच्याकडे सकारात्मक ऊर्जा असते. त्यांच्या डोक्यात दुसरा कोणताही विचार नसतो. फक्त एकच विचार असतो विठ्ठल आवडी प्रेमभावो. महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठू माऊलीचा जप करीत करीत वारकरी अतिशय प्रसन्नतेने आनंदाने महायोग पंढरपूर कडे निघालेले आहेत. वारकऱ्यांच्या प्रसन्नतेचे आणि आनंदाचे कारण म्हणजे विठू माऊलीचा जप हा सातत्याने सुरू असतो. त्यामुळे त्यांच्या मनाला एक प्रकारची बळकटी येते आणि मन त्यांचे सतत ताजे तवाने आणि आनंदी राहते. हीच नामाची ताकद आहे. अनेक जण विचारतात विठ्ठलाचे नाम पुन्हा पुन्हा घ्यायचे का आपण आपला श्वास मोजतो का श्वास घेतच राहतो. त्याच प्रकारे विठ्ठलाचे नाम हा वारकऱ्यांचा श्वास आहे. विठू माऊली चे नाव मनाला संतुलित करण्याचे काम करते. एका रोशनकारांनी एक उदाहरण सांगितले. आषाढी एकादशीला सर्व पालख्या पंढरीला पोहोचल्या. अतिशय उत्तम असा सोहळा संपन्न झाला. परंतू ज्या वेळेला परतीची वेळ आली ,त्यावेळेला एका ९० वर्षाच्या मावशीच्या डोळ्यात सतत पाणी येत होते. तिला विचारले, मावशी तुमच्या डोळ्यात सतत पाणी का येत आहे तिने जे उत्तर दिले ते खरे नामाचे महत्त्व आहे. ती म्हणाली, मी माझ्या गावापासून या विठू माऊली चे नाव घेत आहे. नाम जप करीत करीत पंढरीला आले .त्याचे दर्शन पाहून मी सुखावून गेले. आता मला पंढरपूर सोडायचे आहे. मी काल्याच्या कीर्तनातील लाह्या छोट्या गाठोड्यात बांधून माझ्या पणतू साठी घेतले आहेत. मला पंढरपूर सोडताना खूप रडू येत आहे. माझे डोळे स्वतः विठू माऊली पुसत आहे. तरी पुन्हा पुन्हा या डोळ्यातून अश्रू येत आहे. त्यावेळी विठू माऊली म्हणते माझा नाम जप करीत करीत तू आता घरी जा. माझे नाव तुझ्या मुखात सतत असल्यामुळे मी तुझ्याबरोबरच आहे. हा नामाचा महिमा आहे. विठ्ठलाचे नाम मुखात असणे म्हणजे आपल्यामध्ये बदल करणे होय. विठ्ठल नामाला एक अधिष्ठान आहे. विठ्ठल नाम हे आपल्या विकारांना आणि विकृतीला बाजूला सारते. विठ्ठल नामाचे महत्व आपल्याला पालखी सोहळ्यामध्ये कळते. ज्यावेळेला आपल्याला या नामाचे महत्त्व कळते खऱ्या अर्थाने आपल्याला आपल्या जगण्याचा वर्तमान कळतो. हा जगण्याचा वर्तमान आपण खऱ्या अर्थाने वारीतील वारकऱ्यांकडून समजून घ्यावा.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# पावसामुळे तालुक्यात २६ घरांची पडझड, अनेक गोठ्यांचे नुकसान

संगमनेर (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यात गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या सलग भिज पावसाचा मोठा फटका ग्रामीण भागाला बसला आहे. सावरगावतळ, शेडगाव, शिबलापूर, पिंपळगाव माथा, निमगाव टेंभा, अकलापूर, शिरापूर यांसह तालुक्यातील एकूण २६ घरांची पडझड झाली असून चार जनावरांच्या गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी मातीची घरे व भिंती कोसळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.



सावरगावतळ येथील वयोवृद्ध शेतकरी कारभारी दशरथ थिटमे, दादाभाऊ एकनाथ नेहे आणि भाऊसाहेब विठोबा नेहे यांच्या राहत्या घरांच्या भिंती बुधवारी (ता. ८) सकाळी अचानक कोसळल्या. या घटनेत घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, घरांच्या भिंती कोसळल्याने संबंधित कुटुंबांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून सुरक्षित निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास उर्वरित भिंतीदेखील कोसळण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहीती मिळताच प्रांताधिकारी अरुण उंडे व तहसीलदार धीरज मांजरे यांनी तात्काळ पंचनामा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ग्राममहसूल अधिकारी महेश वाडेकर यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचे पंचनामे केले. याचप्रमाणे शेडगाव, शिबलापूर, पिंपळगाव माथा, निमगाव टेंभा, अकलापूर, शिरापूर यांसह इतर गावांमध्येही अनेक घरांच्या भिंती कोसळल्या असून काही ठिकाणी घरे पडली आहेत. तसेच चार जनावरांच्या गोठ्यांचेही नुकसान झाल्याची नोंद आहे. बहुतांश घरे मातीची असल्याने सलग पडणाऱ्या भिज पावसामुळे ही पडझड झाल्याचे सांगितले जात आहे. महसूल विभागाकडून पंचनामे करण्यात आले आहे.

दरम्यान, सलग झालेल्या पावसामुळे तालुक्यातील अनेक विहिरी तुडुंब भरल्या असून शेतजमिनींमध्ये पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. सततचे ढगाळ वातावरण, अतिवृष्टी आणि जमिनीत वाढलेला ओलावा यामुळे पिकांमध्ये बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय...

## शेतकरी महिलांना सन्मानाचा हक्क

महाराष्ट्र शासनाने महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ प्रशासकीय बदल नसून ग्रामीण समाजव्यवस्थेतील ऐतिहासिक आणि क्रांतिकारी पाऊल आहे. शेतात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या महिलांच्या श्रमांना आजवर अधिकृत मान्यता मिळाली नव्हती. त्या पेरणीपासून कापणीपर्यंत, जनावरांच्या संगोपनापासून शेती व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर सक्रिय असतानाही त्यांच्या नावावर शेतकरी म्हणून नोंद नव्हती. शासनाच्या या निर्णयामुळे आता महिला शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाची आणि योगदानाची अधिकृत ओळख मिळणार आहे. भारतीय शेतीची खरी ताकद ही शेतकरी कुटुंबांमध्ये दडलेली आहे आणि त्या कुटुंबाचा कणा म्हणजे महिला. ग्रामीण भागातील महिला पहाटेपासून रात्रीपर्यंत घर आणि शेतीची दुहेरी जबाबदारी सांभाळतात. शेतातील कामे, जनावरांची देखभाल, बियाण्यांचे जतन, दुग्धव्यवसाय, भाजीपाला उत्पादन अशा अनेक क्षेत्रांत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असते. अनेक वेळा पुरुष रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित झाल्यानंतर संपूर्ण शेतीची जबाबदारी महिलांवर येते. तरीही समाजाने आणि प्रशासनाने त्यांच्याकडे शेतकरी म्हणून पाहिले नाही, ही मोठी विसंगती होती. विशेषतः कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांमध्ये महिलांनीच संसाराचा गाडा ओढला आहे. पतीच्या निधनानंतर मुलांचे शिक्षण, कुटुंबाची जबाबदारी आणि शेतीचे व्यवस्थापन या सर्व गोष्टी त्यांनी खंबीरपणे सांभाळल्या. मात्र, कागदोपत्री त्या शेतकरी नव्हत्या. शासनाच्या अनेक योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. पीकविमा, कृषी अनुदान, बँक कर्ज, प्रशिक्षण आणि विविध योजनांपासून त्या अनेकदा वंचित राहत होत्या. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या निर्णयामुळे शासनाकडे महिला शेतकऱ्यांची अधिकृत माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्यांच्या गरजा आणि समस्यांनुसार स्वतंत्र धोरणे तयार करणे शक्य होईल. महिला शेतकऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम, कृषी तंत्रज्ञानाची माहिती, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग आणि कृषी उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देता येतील. ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग अधिक प्रभावी आणि दृश्यमान होईल. या निर्णयाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे महिलांच्या आत्मसन्मानात होणारी वाढ. मी शेतकऱ्याची पत्नी नाही, मी स्वतः शेतकरी आहे, असे अभिमानाने सांगण्याचा अधिकार त्यांना मिळणार आहे. हा केवळ एका शब्दाचा बदल नाही, तर तो ग्रामीण स्त्रीच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारा आहे. तिच्या श्रमाला आणि योगदानाला मिळालेली ही अधिकृत मान्यता समाजाच्या दृष्टिकोनातही बदल घडवून आणेल. ग्रामीण भागात महिलांच्या कामाला अनेकदा कर्तव्य म्हणून पाहिले जाते, त्याला आर्थिक मूल्य दिले जात नाही. पण आता परिस्थिती बदलण्याची संधी निर्माण झाली आहे. कुटुंबातील शेतीविषयक निर्णयांमध्ये महिलांचा सहभाग वाढेल. पीक नियोजन, बाजारपेठेतील संधी, तंत्रज्ञानाचा वापर आणि आर्थिक व्यवस्थापन यामध्ये त्यांचे मत अधिक महत्त्वाचे ठरेल. यामुळे शेती अधिक सक्षम आणि शाश्वत होण्यास मदत होईल. आर्थिकदृष्ट्याही या निर्णयाचे दूरगामी परिणाम दिसून येतील. महिला शेतकरी थेट लाभार्थी म्हणून विविध योजनांमध्ये सहभागी होऊ शकतील. बँकिंग सेवा, कर्ज सुविधा, स्वयंरोजगार, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उद्योग क्षेत्रात त्यांना अधिक संधी उपलब्ध होतील. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला यामुळे मोठी चालना मिळेल. याचा परिणाम पुढील पिढीवरही होणार आहे. ग्रामीण भागातील मुलींना शेती हा सन्मानाचा आणि संधींनी भरलेला व्यवसाय वाटू लागेल. शिक्षित तरुणी कृषी क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानासह पुढे येतील. अन्न प्रक्रिया उद्योग, जैविक शेती, डिजिटल शेती आणि कृषी उद्योजकता यामध्ये महिलांचे नेतृत्व वाढेल. ग्रामीण भारताच्या विकासाला यामुळे नवी दिशा मिळू शकते. मात्र, कोणत्याही चांगल्या निर्णयाचे यश त्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक पात्र महिला शेतकऱ्याची नोंद होणे आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या अधिकारांची माहिती मिळाली पाहिजे. कृषी विभाग, महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासन यांनी समन्वयाने काम करून हा निर्णय तळागाळापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. याचबरोबर समाजालाही आपली मानसिकता बदलावी लागेल. शेतातील कष्ट फक्त पुरुषांचे असतात, ही धारणा आता मागे पडली पाहिजे. स्त्री ही मदतनीस नसून शेतीची समान भागीदार आहे, ही जाणीव समाजाने स्वीकारली पाहिजे. महिलांचा सन्मान हा केवळ भाषणांचा विषय न राहता तो व्यवहारातही दिसून आला पाहिजे. महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय इतर राज्यांसाठीही दिशादर्शक ठरू शकतो. भारतातील कृषी विकास महिलांच्या सहभागाशिवाय शक्य नाही. त्यांना अधिकार, सन्मान आणि ओळख दिल्याशिवाय शेतीचा विकास पूर्ण होऊ शकत नाही. महिला शेतकरी ही आजवर भारतीय शेतीची अदृश्य शक्ती होती; आता ती अधिकृतपणे दृश्यमान झाली आहे.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी समिती नेमण्याचा बैठकीत निर्णय



युवावार्ता (प्रतिनिधी)

राहुरी - महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील उपस्थित होते. प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या आणि प्रलंबित प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करून त्यावर योग्य तो मार्ग काढण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, या समितीत प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधींचाही समावेश करण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले आहे.

प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा, त्यांच्या प्रलंबित प्रश्नांचे लवकरात लवकर निराकरण व्हावे आणि शासन स्तरावर सकारात्मक निर्णय व्हावेत, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार अक्षय कर्डिले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे निबंधक राजेंद्र पाटील, मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# गोजातीय प्रजनन अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा आणि प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ लागू करण्यात आला आहे. मात्र, अद्याप क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार आणि संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर अधिनियमाअंतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे हा या अधिनियमाचा मुख्य उद्देश आहे. अधिनियमानुसार राज्यातील सर्व कृत्रिम रेतन केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांनी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित आणि उच्च वंशावळीच्या वळूचेच गोठवलेले रेत प्रजननासाठी वापरता येणार आहे.

या प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती घेणे तसेच नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिनियमानुसार नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास दोष सिद्ध झाल्यावर रु. ५० हजारांपर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्राशिवाय गोजातीय प्रजनन क्रिया करणे, प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोठवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास दोष सिद्ध झाल्यावर रु. १ लाखांपर्यंत दंड आकारला जाईल. तसेच नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची किंवा दिशाभूल करणारी जाहिरात अथवा प्रसिद्धी केल्यास दोष सिद्ध झाल्यावर सहा महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा रु. २ लाखांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. शेतकऱ्यांनी केवळ प्रमाणित आणि अधिकृत विर्यमात्रांचाच वापर करावा. सेवा घेण्यापूर्वी संबंधित तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासून नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच सेवा घ्यावी. कोणतीही अनियमितता आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवून पशुधनाचे संरक्षण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सुधारित आणि उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन, उत्तम प्रजननक्षमतेमुळे जनावरांची संख्या व गुणवत्ता वाढ, वैज्ञानिक आणि नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास तसेच दुग्ध व्यवसायात स्थैर्य आणि आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# 'एन पी व्हिजन'च्या 'तेरे बिना अधुरा' अल्बमच्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते शानदार अनावरण




युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी - मराठी मनोरंजन विश्वात आपल्या दर्जेदार आशयाने अल्पावधीतच लोकप्रियतेचे शिखर गाठणाऱ्या 'एन पी व्हिजन' या युट्युब चॅनेलने आता एक नवीन पाऊल उचलले आहे. 'तेरे बिना अधुरा' या आगामी म्युझिक अल्बमच्या पोस्टरचे अनावरण नुकतेच विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'एन पी व्हिजन'च्या यापर्यंतच्या प्रवासाचे आणि नवनवीन प्रयोग करण्याच्या धडपडीचे उपस्थितांकडून भरभरून कौतुक करण्यात आले. अगदी कमी कालावधीत प्रेक्षकांच्या मनात आपले अढळ स्थान निर्माण करणारा हा चॅनेल आता आपल्या या नवीन सादरीकरणातून प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देण्यासाठी सज्ज झाला आहे.

या अनावरण सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवर आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यामध्ये विजय माळवे सर, सतीश मनतोडे सर, मेजर शेवंते साहेब, रावसाहेब पर्वत साहेब, पत्रकार कोंडीराम नेहे साहेब, आणि दरेकर सर यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्तींनी उपस्थित राहून या अल्बमला आणि संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बोलताना उपस्थित मान्यवरांनी असे मत व्यक्त केले की, 'एन पी व्हिजन'चा प्रवास हा अत्यंत कौतुकास्पद असून, त्यांनी ज्या पद्धतीने कमी वेळात आपली ओळख निर्माण केली आहे, एमपी व्हिजनचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी नवोदित कलाकारांना संधी देत चांगल्या कलाकारांना अभिनयाची एक चांगली संधी उपलब्ध करून दिली त्यांच्या या प्रवासात एम पी व्हिजन चैनल हे कलाकारांना आपलेसे वाटतं त्यामुळे निर्माते आबा निर्मळ यांनी व प्रमोद निर्मळ घेतलेली मेहनत खरोखरच प्रेरणादायी आहे.

'तेरे बिना अधुरा' हा अल्बम नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, तो अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल, असा ठाम विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. या गाण्यातील आशय, सादरीकरण आणि सांगीतिक बांधणी ही प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारी असेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. मनोरंजन क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या नवीन चेहऱ्यांना संधी मिळवून देण्यामध्ये 'एन पी व्हिजन'ने नेहमीच पुढाकार घेतला असून, हा अल्बम या प्रवासातील एक मोलाचाठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. एकूणच, हा कार्यक्रम 'एन पी व्हिजन'च्या पुढील वाटचालीस अधिक बळ देणारा ठरला आहे यावेळी अल्बमच्या पोस्टर अनावरण कार्यक्रमाच्या वेळी दिग्दर्शक निर्माते आबा निर्मळ , ज्ञानेश्वर साबळे , रूपाली भालेराव, गोपाळ राऊत आणि श्रीपाद बोकंद हे देखील उपस्थित होते

पान १ वरून

# पालिका निवडणूकीतील...

प्रधान सचिव नगर विकास व सर्व विभागांच्या प्रमुखांची बैठक झाली. यावेळी लोकसभा व विधानसभेची आचारसंहिता लागणार असल्याने या योजनेला तातडीने कार्यारंभ करावा अशा सूचना नगर विकास विभागाकडून देण्यात आल्या. सदर टेंडर मधील वाढीव रकमेबाबत एमजीपी व शासनाच्या विभागाकडून दुरुस्ती करून घ्यावी. अशा सूचना देण्यात आल्या. यानंतर ही दुरुस्ती करून घेऊन शासनाचे सर्व विभाग जिल्हाधिकारी व एमजीपीचे प्रमुख यांच्या वतीने ही मंजुरी देण्यात आली. या व्यतिरिक्त या पूर्ण योजनेचे बिल देताना थर्ड पार्टी ऑडिट करण्यात आले असून त्यानंतर बिल दिले आहे. यामध्ये शासनाच्या सर्व विभागांच्या पूर्ण मंजुरी आहेत कुठेही चुकीचे काही झाले नाही .

मात्र संगमनेर शहर व तालुका यांची प्रगती ही संगमनेर ब्रँड म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे. याचे श्रेय त्यांना कधीही मिळत नाही. याला बदनाम करण्यासाठी विधानसभेसारख्या पवित्र सभागृहांमध्ये नवीन लोकप्रतिनिधी अत्यंत चुकीच्या पद्धतीने आणि अपूर्ण माहितीच्या आधारे मांडणी करून जनतेची दिशाभूल करत आहे.

आतापर्यंत शहर व तालुक्यासाठी एक रुपयाही निधी न आणता फक्त बदनामी करण्याचे काम त्यांनी केले आहे. या योजनेबाबत राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले . या चौकशीचे आम्ही स्वागतच करतो. यामुळे खोटे आरोप करणारे आणि तोंडाच्या वाफा दवडणारे लोक तोंडावर पडतील हे नक्कीच असल्याचे सौ. दुर्गाताई तांबे म्हणाल्या.

# प्रशासनाची झोप कायम! ...

यापूर्वी आगार प्रशासनाने संबंधित कंपनीला स्मरणपत्रे देऊनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही.

बसस्थानक परिसरात पर्यायी सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. स्वच्छ भारतचा संदेश देणाऱ्या प्रशासनालाच स्वतःच्या बसस्थानकातील स्वच्छतागृह स्वच्छ ठेवता येत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.

या गंभीर प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन स्वच्छतागृहाची त्वरित साफसफाई करावी, तुंबलेली शौचालये कार्यान्वित करावीत आणि जबाबदारीत कसूर करणाऱ्या संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी प्रवासी, व्यापारी आणि नागरिकांकडून होत आहे. अन्यथा प्रवासी व नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात येत आहे.

**छोट्या जाहिरातासाठीसंपर्क करा**
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
प्रो-माईन्ड एआय आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसाठी त्वरित दोन जागा भरणे आहे.
(B.E Comp/IT, BCA/BCS)
— संपर्क —
8282825818

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर )
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत ( तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397






# कविवर्य नारायण सुर्वे जन्मशताब्दीनिमित्त संगमनेरात १२ जुलै रोजी भव्य पुस्तक जत्रा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त साहित्य, कला व सांस्कृतिक संघ, संगमनेर यांच्या वतीने रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी भव्य 'पुस्तक जत्रा' आणि विविध साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती संस्थेचे अध्यक्ष रमेश शिंदे यांनी दिली.



संगमनेर येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात वरिष्ठ महाविद्यालयाच्या आवारातील के. बी. दादा देशमुख सभागृहात हा दिवसभर चालणारा कार्यक्रम होणार असून, साहित्यप्रेमींसाठी विविध उपक्रमांची मेजवानी असणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ संपादक उत्तम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन लोकनेते व माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी स्वागताध्यक्ष डॉ. सुधीर तांबे, डॉ. संजय मालपाणी, नामवंत गीतकार बाबासाहेब सौदागर, पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, डॉ. संजय कळमकर, तुकाराम धांडे, शशीकांत शिंदे, सोमनाथ कळसकर, सुनील गोसावी, संदीप वाकचौरे, बाळासाहेब कोठुळे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, शब्बीर शेख, डॉ. संतोष खेडलेकर, डॉ. सोमनाथ मुटकुळे, गायत्री रामटेके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडीने होईल. उद्घाटनानंतर आयोजित परिसंवादात 'नवोदित साहित्यिक आणि त्यांच्यापुढील आव्हाने' या विषयावर हिरालाल पगडाल मार्गदर्शन करतील, तर शिक्षण अभ्यासक संदीप वाकचौरे 'साहित्याने समाजाला काय दिले?' या विषयावर आपले विचार मांडतील.

दुपारच्या सत्रात डॉ. संजय कळमकर 'कथा' या विषयावर व्याख्यान देतील, तर गायत्री रामटेके एकपात्री अभिनय सादर करणार आहेत. सायंकाळी ४ वाजता भव्य कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून, त्याचे चार सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले आहे. प्रथम सत्राचे अध्यक्ष शशीकांत शिंदे, द्वितीय सत्राचे तुकाराम धांडे, तृतीय सत्राचे सुनील गोसावी आणि चतुर्थ सत्राचे बाळासाहेब कोठुळे हे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

हा पुस्तक जत्रा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव राजाभाऊ भांडगे, कार्याध्यक्ष डॉ. विवेक वाकचौरे, कोषाध्यक्ष नितीन कोळपकर तसेच वंदना बाचकर, डॉ. निलीमा निघुते, संजय शेलार, दीपक टाक, विजय पाटील, जयश्री शिंदे, प्रकाश पारखे, अशोक वरुडे, अनुराधा आहेर, आसावरी रत्नपारखी, पुष्पाताई निऱ्हाळी आणि संस्थेच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

# अकोलेची सायकल दिंडी पंढरीच्या दिशेने

युवावार्ता (प्रतिनिधी)

ज्ञानोबा माऊली... तुकाराम... जय हरी विठ्ठल... या नामघोषाने अगस्ती आश्रम परिसर दुमदुमून गेला होता. पावसाच्या रिमझिम सरी, विठ्ठलभक्तीचा ओलावा आणि सायकलस्वारांचा उत्साह यांचा सुंदर संगम अनुभवत अगस्ती सायकल क्लब, अकोलेच्यावतीने आयोजित अकोले ते पंढरपूर हरित सायकलवारी शुक्रवारी पहाटे रवाना होणार आहे.



मॉर्निंग वॉक ग्रुप अकोलेचा भाग असलेल्या अगस्ती सायकल क्लब तर्फे सलग तिसऱ्या वर्षी या सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. अकोले ते पंढरपूर हे सुमारे ३३० किलोमीटरचे अंतर अवघ्या दोन दिवसांत पूर्ण करण्याचा संकल्प सायकलस्वारांनी केला आहे. या वारीचा मार्ग अकोले-संगमनेर-लोणी-राहुरी-अहिल्यानगर-करमाळा-कुर्डूवाडी-पंढरपूर असा असून पहिला मुक्काम रुईछत्तीसी (अहिल्यानगर) येथे तर दुसरा मुक्काम पंढरपूर येथे असेल.

पंढरपूर येथे १२ जुलै रोजी महाराष्ट्र सायकलिस्ट असोसिएशनच्यावतीने वारकरी रिंगण सोहळ्याच्या धर्तीवर भव्य 'सायकल रिंगण सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात अगस्ती सायकल क्लबचे सदस्य सहभागी होणार असून राज्यातील पाच हजारांहून अधिक सायकलपटू यात सहभागी होणार आहे. ही सायकल वारी केवळ विठ्ठलभक्तीपुरती मर्यादित नसून चांगले आरोग्य, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्ती, इंधन बचत आणि स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचेही महत्त्वपूर्ण कार्य करणार आहे. आमची वारी... हरित सायकल वारी या प्रेरणादायी घोषवाक्याखाली ही जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

सायकलवारीत डॉ. विष्णु बुळे, डॉ. दर्शन बंगाळ, राजेंद्र देशमुख, अशोक चौधरी, डॉ. शामकांत शेटे, किरण मालुंजकर, अरुण भालेराव, अतुल ढोके, बुधाजी पेढेकर, सखाहारी दाते, साहिल दाते, भाऊसाहेब कासार, वेदांत कासार, उत्तम बनकर, बबन रणपिसे,दिलीप कोकणे, रमेश पुंडे, रावसाहेब वावळे, निवृत्ती चौधरी, राजेंद्र पुंड, निवृत्ती कर्पे, ऋषिकेश आरोटे, भास्कर दिघे, वसंत आहेर, बालचंद हासे, प्रवीण आंबेकर, धनंजय वाकचौरे, गोरक्षनाथ आवारी शंकर लांडे, नरेंद्र फटांगरे, रेखा फटांगरे, महेश हासे, अर्जुन भुसारी, अमित वैद्य, अभिषेक फापाळे, नरेंद्र नवले, अनुज व्यवहारे, विनायक कदम नरेंद्र राठोड, कृष्णा साबळे, जया साबळे, मयूर साबळे, योगेश काळे, माधुरी काळे, पेढेकर मॅडम, मुठे साहेब, करण ताठे, डॉ.दिलीप लोहारे,सागर पुंडे, महेश शेटे, संतोष जाधव, जयश्री शिंदे, गुणाजी एखंडे यांच्यासह चार डॉक्टर पंधरा शिक्षक पाच महिला एक तलाठी दोन इंजिनियर एक प्राचार्य तेरा व्यापारी सहा विद्यार्थी दोन वन कर्मचारी आदी सायकलपट्टू सहभागी होत आहेत.

# राज्यात नर्सिंग शिक्षणाच्या विस्ताराला मान्यता - हसन मुश्रीफ

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील आरोग्य व्यवस्थेसाठी कुशल परिचारिकांची (नर्सिंग स्टाफ) उपलब्धता वाढविण्याच्या आणि गरीब विद्यार्थ्यांना शासकीय महाविद्यालयांद्वारे अत्यंत कमी शुल्कामध्ये दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य मंत्रिमंडळाने नर्सिंग शिक्षणाच्या विस्तारास मान्यता दिली आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी बुधवारी विधानसभेत निवेदनाद्वारे या निर्णयाची घोषणा केली.



या महत्त्वाकांक्षी विस्तार प्रकल्पासाठी राज्य सरकारने ४९१.९१ कोटी रुपयांच्या अनावर्ती आणि वार्षिक १२.५८ कोटी रुपयांच्या आवर्ती खर्चास मंजुरी दिली असून, यामुळे राज्यातील शासकीय आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्यास मोठी मदत होणार आहे.वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी विधानसभेत सादर केलेल्या माहितीनुसार, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये नर्सिंगच्या जागा वाढवण्यासाठी आणि नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी त्रिस्तरीय आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार, मुंबई (जी.टी. रुग्णालय), मुंबई (सेंट जॉर्जेस रुग्णालय), धुळे, सोलापूर, अंबाजोगाई (बीड), अकोला, नागपूर (आयजीएमसी) आणि सांगली येथील ८ शासकीय 'जी.एन.एम.' महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन (अपग्रेडेशन) केले जाणार आहे. या सर्व ठिकाणी आता १०० प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यात येतील. याशिवाय, मुंबई (जे.जे. रुग्णालय), नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे व नांदेड या ५ विद्यमान शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयांची सध्याची ५० असणारी प्रवेश क्षमता आता १०० करण्यात येणार आहे.राज्यातील नर्सिंग शिक्षणाचे जाळे अधिक विस्तारण्यासाठी चंद्रपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, अलिबाग, रत्नागिरी, अमरावती, धाराशिव, गडचिरोली, पालघर आणि अहिल्यानगर अशा १० जिल्ह्यांमध्ये नवीन बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत.

तर उर्वरित ठाणे, सातारा, नाशिक, जालना, बुलढाणा, परभणी, हिंगोली, वाशिम, वर्धा आणि भंडारा या १० जिल्ह्यांमध्येही अशी महाविद्यालये सुरू करण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने एकमताने घेतला असल्याची माहिती मंत्री हसन मुश्रीफ यांनी सभागृहात दिली

# बसस्थानकासमोरील...

पान १ वरून - नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. एखादे वाहन रस्त्यात अडकल्यास अर्धा-अर्धा तास वाहतूक ठप्प होते. या काळात वाहनांच्या कर्कश हॉर्नमुळे परिसरातील रहिवाशांचे दैनंदिन जीवनही विस्कळीत होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिकांच्या मते, शहराच्या मध्यवर्ती भागात अशी परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगरपालिकेने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी वाहतूक व पार्किंग नियोजन करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. तसेच, स्टेट बँकेने या ठिकाणाहून स्थलांतराचा विचार करावा किंवा किमान आपल्या ग्राहकांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था उभी करावी, अशी मागणीही परिसरातील नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरलेल्या या प्रश्नावर प्रशासन आणि संबंधित संस्थांनी त्वरित निर्णय घेण्याची गरज व्यक्त होत आहे.


११/६ युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची


# भंडारदरा धरण ६५ टक्के भरले

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - उत्तर नगर जिल्ह्याची भाग्यरेखा असलेल्या भंडारदरा धरण पाणलोटात पुनर्वसु नक्षत्रांच्या सरींचे तांडव केल्याने धरणात वेगाने नवीन पाण्याची आवक होत आहे. ११०३९ दलघफू क्षमतेच्या भंडारदरा धरण पाणीसाठा ६४७४ दलघफू (५८.६५ टक्के) झाला होता. या भागात पाऊस थांबला असलातरी पाण्याची आवक सुरूच असल्याने रात्री उशीरा या धरणातील पाणीसाठा रात्री उशीरा ६० टक्क्यांवर पोहचला होता. आज सकाळी १० वाजेपर्यंत हा पाणीसाठा ६५ टक्क्यांवर पोहचलेला असेल.वाकीचा ५३१० क्युसेकपर्यंत वाढलेला विसर्ग तसेच अन्य येणारे पाणी प्रवरा नदीत जमा होत असल्याने निळवंडे धरणातील पाणीसाठाही झपाट्याने वाढत आहे. ८३३० दलघफू क्षमतेच्या या धरणात २७५९ दलघफू (३३ टक्के) झाला होता. काल दुपारनंतर पावसाचा वेग कमालीचा मंदावला असल्याने धरणाकडे येणारी आवकही आता मंदावू लागली आहे. दरम्यान, गत तीन दिवसांत धो धो पाऊस झाल्याने पाणलोटात मोठ्या प्रमाणात भात रोपे व बांधांचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जमीनही वाहून गेली आहे. इतरही नुकसान आहे. या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकरी करीत आहेत.अहिल्यानगर जिल्ह्याची जीवनदायिनी असलेल्या मुळा धरण पाणलोटातील अकोलेतील हरिश्चंद्र गड, पाचनई, आंबित व अन्य भागात अतिवृष्टी होत असल्याने मंगळवारी दुपारपासून अकोलेतील मुळा नदीला पूर होता. पण आता पावसाचा जोर ओसरल्याने पूरही घटला.सकाळी कोतूळ येथील मुळा नदीचा विसर्ग केवळ ६९५१ क्युसेक होता. पण धो धो पाऊस कोसळत असल्याने सकाळी ९ वाजता तो २७१६५ क्युसेकपर्यंत वाढला. दुपारी ३ वाजता हा विसर्ग २६५१६ क्युसेक होता. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता हा विसर्ग ८३७३ क्युसेक पर्यंत खाली आला होता. रात्री ९ वाजता कोतूळ येथील विसर्ग ११९५२ क्युसेक होता.

तर पाणीसाठा ९०७४ दलघफू आहे. दरम्यान, पुरामुळे लहीत खुर्द-लहीत बुद्रुक जोडणारा पूल पाण्याखाली गेला असून दोन्ही गावांमधील संपर्क पूर्णपणे खंडित झाला होता. पुराचे पाणी कोतूळ येथील कोतूळेश्वर मंदिराला पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे. पण तो कमी झाला आहे. तसेच शेती जलमय झाली असून प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतात अजूनही पाणीच पाणी असून ते बाहेर काढण्याचा शेतकरी प्रयत्न करीत आहेत. भातरोपांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

# यंत्रे शिकत आहेत... पण माणूस शिकणे विसरत आहे का?

आजचे जग वेगाने बदलत आहे आणि या बदलाच्या केंद्रस्थानी आहे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आणि मशीन लर्निंग. आधुनिक तंत्रज्ञानाची कल्पनाही आता मशीन लर्निंगशिवाय करणे कठीण झाले आहे. आपल्या घरातील स्मार्ट टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल फोन, व्हॉइस असिस्टंट, स्वयंचलित वाहने आणि ऑनलाइन सेवा या सर्व यंत्रणा आपल्या सवयी, आवडी-निवडी आणि वापराच्या पद्धती समजून घेत आहेत. आपण कोणते कार्यक्रम पाहतो, कोणते गाणे ऐकतो, कोणती वस्तू खरेदी करतो किंवा कोणत्या ठिकाणी जातो, याची माहिती गोळा करून ही यंत्रे अधिकाधिक स्मार्ट होत आहेत.




यंत्रांच्या या शिकण्याच्या क्षमतेमुळे आपल्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडून आले आहेत. कामे जलद होऊ लागली, निर्णय घेणे सोपे झाले आणि वेळेची बचत होऊ लागली. काही वर्षांपूर्वी ज्या गोष्टींसाठी तासन्तास मेहनत घ्यावी लागत होती, त्या आज काही सेकंदांत पूर्ण होत आहेत. परंतु या सुविधांसोबत एक गंभीर प्रश्नही समोर येत आहे. जशी यंत्रे अधिक स्मार्ट होत आहेत, तसे आपण स्वतः विचार करणे, शिकणे आणि कौशल्य विकसित करणे कमी करत आहोत.

आज अनेकांना मोबाईलमधील कॅल्क्युलेटरशिवाय साधी बेरीज किंवा वजाबाकी करणे कठीण जाते. एकेकाळी पाढे, अपूर्णांक आणि गणिती प्रक्रिया तोंडपाठ असणारी पिढी आता हळूहळू मागे पडत आहे. नेव्हिगेशन ॲप्समुळे रस्ते लक्षात ठेवण्याची गरज उरलेली नाही, तर इंटरनेटमुळे माहिती लक्षात ठेवण्याची सवयही कमी होत चालली आहे. आपण माहिती मिळवण्यात तर पारंगत होत आहोत, पण ज्ञान निर्माण करण्यात मागे पडत आहोत.

यंत्रे डेटा आणि अल्गोरिदमच्या आधारे शिकतात. त्यांच्याकडे भावना नसतात, अनुभवांचे चिंतन नसते आणि नैतिकतेची जाणीवही नसते. त्याउलट, माणसाकडे विचारशक्ती, कल्पनाशक्ती, अनुभवांचे विश्लेषण करण्याची क्षमता आणि परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे सामर्थ्य आहे. मानवी मेंदूची सर्वात मोठी ताकद म्हणजे तो केवळ माहिती साठवत नाही, तर त्या माहितीचे ज्ञान आणि अनुभवात रूपांतर करतो.

मशीन लर्निंग आणि मानवी शिक्षण यामधील हाच मूलभूत फरक आहे. यंत्रे केवळ शिकतात, पण माणूस शिकतो, विचार करतो, प्रश्न विचारतो आणि नव्या कल्पना निर्माण करतो. चिंतन, आत्मपरीक्षण आणि अनुभवांचे विश्लेषण यांमधून मानवी व्यक्तिमत्त्व विकसित होत असते. त्यामुळे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी मानवी बुद्धिमत्तेची जागा कोणतेही यंत्र घेऊ शकत नाही.

वैद्यकीय क्षेत्र हे याचे उत्तम उदाहरण आहे. प्रत्येक डॉक्टर रुग्णांवर उपचार करताना अनुभव मिळवत असतो. मात्र प्रत्येक डॉक्टर त्या अनुभवाचे ज्ञानात रूपांतर करू शकत नाही. काही डॉक्टर केवळ उपचार करतात, तर काही डॉक्टर अनुभव, निरीक्षण, अभ्यास आणि चिंतन यांच्या साहाय्याने अद्वितीय कौशल्य विकसित करतात. म्हणूनच काही वेळा अत्यंत गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये अनुभवी तज्ज्ञ अशक्य वाटणारे परिणामही साध्य करतात.

हीच बाब शिक्षण, उद्योग, शेती, कला आणि प्रशासन अशा प्रत्येक क्षेत्राला लागू होते. शिकण्याची क्षमता, शिकण्याची सवय आणि शिकण्याचे कौशल्य या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. जो व्यक्ती सतत शिकत राहतो, तोच काळाच्या पुढे राहतो. केवळ वय वाढणे म्हणजे प्रगल्भ होणे नाही; तर अनुभव, विचार आणि ज्ञान यांमधून स्वतःला अधिक सक्षम बनवणे म्हणजे खऱ्या अर्थाने प्रगल्भ होणे होय.

वृद्ध होणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे, परंतु परिपक्व होणे हा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न असतो. वाचन, चिंतन, संवाद आणि अनुभव यांमधून सतत शिकणारा माणूसच समाजासाठी प्रेरणादायी ठरतो. तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, परंतु त्यावर पूर्णपणे अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते.

म्हणूनच मशीन लर्निंगच्या या युगात माणसाने स्वतःचे शिक्षण, विचारशक्ती आणि सर्जनशीलता जपणे अधिक महत्त्वाचे आहे. यंत्रे कितीही स्मार्ट झाली, तरी माणसाने शिकणे थांबवले नाही, तर त्याची बुद्धिमत्ता आणि क्षमता कोणत्याही यंत्रापेक्षा अधिक प्रभावी राहील. भविष्यात यशस्वी तोच होईल, जो तंत्रज्ञानाचा उपयोग करेल; पण स्वतःच्या विचारशक्तीचा त्याग करणार नाही.

# शवविच्छेदन प्रक्रियेत मोठे बदल

## राज्यात विना-चिरफाड शवविच्छेदन पद्धत लागू होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील शासकीय रुग्णालये आणि शवविच्छेदन केंद्रांच्या सक्षमीकरणासाठी शासन अत्यंत सकारात्मक असून, लवकरच या संपूर्ण प्रक्रियेत क्रांतिकारी आणि हायटेक बदल करण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत केली. प्रश्नोत्तराच्या तासात भाजप आमदार चित्रा वाघ यांनी राज्यातील शवविच्छेदन (पोस्ट-मॉर्टम) केंद्रांमधील रिक्त पदे आणि तेथील दुरवस्थेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्री फडणवीस उत्तर देत होते. ९० दिवसांत सर्व रिक्त पदे भरणे तांत्रिकदृष्ट्या पूर्णतः शक्य नसले, तरी शासन अत्यंत वेगाने आणि एका कालबद्ध मोहिमेद्वारे ही पदे भरण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मुख्यमंत्री फडणवीस माहिती देताना म्हणाले, शवविच्छेदन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जगभरात प्रचलित असलेली 'नॉन-इन्व्हेझिव्ह म्हणजेच विना-चिरफाड शवविच्छेदन पद्धत महाराष्ट्रात आणली जाणार आहे. शरीराचा 'पेट स्कैन' करण्याच्या धर्तीवर काम करणाऱ्या या अत्याधुनिक प्रणालीचा पहिला प्रयोग मुंबईतील जे. जे. आणि के. ई. एम. रुग्णालयात सुरू करण्यात येत असून यासाठीचे टेंडर देखील काढण्यात आले आहे. हे प्रायोगिक तत्त्व यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व प्रमुख केंद्रांवर ही डिजिटल पद्धत लागू केली जाईल. या नव्या तंत्रज्ञानामुळे ९०% शवविच्छेदन हे विना-चिरफाड करता येतील आणि केवळ १०% क्लिष्ट किंवा गुन्हेगारी प्रकरणांमध्येच पारंपरिक पद्धतीने चिरफाड केली जाईल, ज्यामुळे वेळेची आणि मॅनपावरची मोठी बचत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आमदार अंबादास दानवे यांनी विसेरा तपासणीसाठी लागणाऱ्या न्यायवैद्यक प्रयोगशाळांच्या विलंबाबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी शासनाच्या कामगिरीची महत्त्वपूर्ण आकडेवारी मांडली. गेल्या दोन-तीन वर्षांत सरकारने केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे फॉरेन्सिक लॅबमधील तब्बल ३ लाख प्रकरणांची प्रलंबितता आता अवघ्या ७५ हजारांवर आणण्यात सरकारला मोठे यश आले आहे, अशी माहिती त्यांनी दिली. येत्या तीन ते चार महिन्यांत ही सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढून ही यंत्रणा पूर्णपणे नियमित केली जाईल.या संवेदनशील चर्चेचा शेवट करताना आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ग्रामीण भागातील शीतकरणाची अपुरी व्यवस्था आणि मृतदेहांच्या स्थितीबद्दल सोशल मीडियावर माहिती जाहीर करणाऱ्या एका डॉक्टर महिला प्रकरणाकडे लक्ष वेधले होते. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, राज्यातील ५३३ केंद्रांपैकी केवळ ३०% ठिकाणी नियमित मृतदेह येतात, तरीही जिथे आवश्यकता आहे तिथे शीतगृहांची व्यवस्था सरकार अधिक मजबूत करेल. तसेच मृतदेहाची गोपनीयता भंग करण्याच्या प्रकारावर अत्यंत कडक भूमिका घेत फडणवीस यांनी सांगितले की, शवविच्छेदनाशी संबंधित कोणतीही माहिती किंवा मृतदेहाच्या शरीराची स्थिती सार्वजनिक करणे हे पूर्णतः बेकायदेशीर आणि चुकीचे आहे. या प्रक्रियेची सर्व निरीक्षणे ही गुप्त ठेवून केवळ पोलिसांना अंतिम अहवालाच्या स्वरूपात सादर करायची असतात.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क अँण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# मांडवे पुलावरील खड्डा ठरतोय जीवघेणा

## उघड्या लोखंडी गजांमुळे अपघाताची भीती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर आणि पारनेर तालुक्यांना जोडणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या मांडवे पुलावर पडलेल्या भल्या मोठ्या खड्ड्यामुळे आणि त्यातून उघडे पडलेल्या लोखंडी गजांमुळे गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. ऐन पावसाळ्यात मुळा नदीला पूर येत असताना पुलाची अवस्था दिवसेंदिवस अधिक धोकादायक बनत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या पुलावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची वर्दळ असते. मात्र पुलाच्या मध्यभागी पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यातील लोखंडी गज पूर्णपणे उघडे पडल्याने दुचाकीस्वारांसाठी हा पूल मृत्यूचा सापळाच ठरत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सध्या पावसाळ्यामुळे पुलावर पाणी साचत असल्याने खड्ड्याचा अंदाज वाहनचालकांना येत नाही. परिणामी, कोणत्याही क्षणी भीषण अपघात होऊन मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप कोणतीही तातडीची दुरुस्ती किंवा सुरक्षेची उपाययोजना केलेली नसल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुळा नदीला दरवर्षी पूर येतो, याची पूर्ण कल्पना संबंधित यंत्रणेला असतानाही पुलाच्या देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. मांडवे पुलाची तातडीने पाहणी करून धोकादायक खड्डा बुजवावा, उघडे पडलेले लोखंडी गज सुरक्षित करावेत आणि पुलाची आवश्यक दुरुस्ती युद्धपातळीवर हाती घ्यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिक आणि वाहनचाल कांकडून करण्यात येत आहे. अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## कार अपघात...

पान १ वरून–

शुद्धीवर आल्यानंतरच गुटखा नेमका कुठून आणला होता, तो कुठे पोहोचविण्यात येणार होता आणि या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत. या कारवाईत पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, सहायक पोलीस निरीक्षक महेश शिंदे, बाबासाहेब शिरसाट, शांताराम झोडगे आणि त्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे. गुटखा तस्करी पुन्हा सक्रिय?

गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कठोर कारवाईमुळे संगमनेर शहरातील अवैध गुटखा विक्रीवर मोठ्या प्रमाणात आळा बसल्याचे चित्र होते. मात्र कऱ्हे घाटातील या अपघातातून छुप्या मार्गाने अजूनही मोठ्या प्रमाणात गुटख्याची वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी

## विरोधी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पाणी साचणे, नाले व गटारी तुंबणे, रस्त्यांवर मोठे खड्डे पडणे, दूषित पाणीपुरवठ्याचा धोका तसेच नदी परिसरात पूरजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी नगरसेविका सौ. साक्षी विनोद सूर्यवंशी यांनी संगमनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देत तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात शहरातील सर्व नाले, गटारी व पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची तातडीने साफसफाई करावी, पाणी साचणाऱ्या भागांमध्ये त्वरित निचऱ्याची व्यवस्था करावी, पावसामुळे खराब झालेल्या रस्त्यांवरील खड्डे बुजवून तात्पुरती दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच धोकादायक अवस्थेतील वीज खांब, विद्युत तारा व बंद असलेल्या पथदिव्यांची तपासणी करून महावितरणच्या समन्वयाने आवश्यक कार्यवाही करावी, पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्यांमध्ये सांडपाणी मिसळणार नाही यासाठी नियमित पाणी तपासणी करावी, नदी परिसरात आपत्ती व्यवस्थापन पथक व अग्निशमन दल सतर्क ठेवावे, पूल व बंधाऱ्यांवर धोक्याचे सूचना फलक लावावेत तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी नियंत्रण कक्ष सुरू करून नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी, अशा विविध मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

यावेळी सौ. साक्षी सूर्यवंशी यांनी नागरिकांनाही सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. नदी-ओढ्यांमध्ये वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहात उतरू नये, पूरस्थिती पाहण्यासाठी अथवा सेल्फी काढण्यासाठी नदी परिसरात गर्दी करू नये, पाण्याखाली गेलेल्या रस्ते, पूल व बंधाऱ्यांवरून प्रवास टाळावा, लहान मुलांना नदी परिसरात एकटे सोडू नये तसेच वीज खांब, तुटलेल्या विद्युत तारा व पाण्यातील विद्युत उपकरणांपासून सुरक्षित अंतर राखावे, असे आवाहन त्यांनी केले. सततच्या पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# दरोडा आणि घरफोडीचे १२ गुन्हे उघड

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर -

पाथर्डी तालुक्यातील किर्तनवाडी येथे जून महिन्यात झालेल्या धाडसी दरोडा प्रकरणाचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणातील दोन चोरट्यांसह चोरीचे सोने घेणार्या सोनाराला अटक करण्यात आली असून त्यांच्या चौकशीत जबरी चोरी व घरफोडीचे एकूण १२ गुन्हे उघडकीस आले आहेत.१० जून रोजी पहाटे दीडच्या सुमारास किर्तनवाडी येथे सात जणांनी रावसाहेब बाजीराव किर्तने यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. त्यांच्यासह पत्नीला मारहाण करून एक लाख ६३ हजार रूपयांचा ऐवज जबरदस्तीने लंपास केला होता. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्याचा तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून तांत्रिक माहिती, बातमीदार आणि व्यावसायिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध सुरू ठेवला.

दरम्यान, ७ जुलै रोजी माहितीच्या आधारे संशयित आरोपी टाकळी मानूर परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून राम कृष्णा चव्हाण (वय २२, रा. चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड) आणि करण रामनाथ भोसले (वय २०, रा. सारोळा कासार, ता. अहिल्यानगर) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत या दोघांनी आपल्या इतर साथीदारांसह किर्तनवाडी येथील दरोडा केल्याची कबुली दिली.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
24x7 Technician
One Time Blood Tubing Use
Modern Dialysis Centre
Nephrologist, AVF Surgery
Renal Dialysis
Dialysis Catheter Insertion
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25